आकाशवाणी नागपूर

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शुक्रवार दिनांक २४ एप्रिल २०२६

ठळक बातम्या

- सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांच्या विलिनीकरणाचा कुठलाही मुद्दा सरकारच्या विचाराधीन नसल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं स्पष्टीकरण.
- नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करण्याचं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचं आवाहन.
- भंडाऱ्यात वऱ्हाडाच्या वाहनाला झालेल्या अपघातात ५ जणांचा मृत्यू, चौघे जखमी.
- **IRCTC** तर्फे नागपूर इथून 12 दिवसांची विशेष "दिव्य दक्षिण यात्रा"
- उद्या अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यासाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा.

निर्मला सीतारामन

सार्वजनिक क्षेत्रातल्या इतर बँकांच्या विलिनीकरणाचा कुठलाही मुद्दा सरकारच्या विचाराधीन नाही. यासंदर्भात उच्च स्तरीय बँकिंग समिती अभ्यास करेल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या. आयडीबीआय बँकेतली निर्गुतवणुकीची प्रक्रीया पुढे सुरू राहणार असल्याचं त्यांनी आज स्पष्ट केलं. त्यांच्या हस्ते आज भारतीय स्टेट बँकेच्या महाराष्ट्र परिक्षेत्राच्या स्थानिक मुख्यालयाचं पुण्यात उदघाटन झालं . देशाच्या विकासात बँकांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचं सीतारामण यांनी आपल्या भाषणात सांगितलं. डिजिटायझेशन महत्वाचं असून त्यामुळेच सर्वसमावेशकतेला चालना मिळते, पण त्याचसोबत आपण आपल्या ग्राहकांपासून दूर न जाता व्यवहारातील मानवी भाव जपायला हवा, असं त्या म्हणाल्या. ग्राहक आणि बँक कर्मचारी यांच्यात प्रत्यक्ष संवादाचं, संबंधाचं महत्त्व अधोरेखित करताना भारतीय स्टेट बँकेच्या प्रयत्नांचं त्यांनी कौतुक केलं.

बावनकुळे

उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर सरकारनं व्यापक कृती आराखडा तयार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार सर्व पालकमंत्र्यांना आवश्यक निर्देश देण्यात

आले आहेत, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. नागपूर इथं आज प्रसार माध्यमांशी त्यांनी संवाद साधला. नागपूर आणि अमरावती इथं बैठका घेऊन जलसाठे मजबूत करणे, पाणी साठवण वाढवणे, अपव्यय टाळणे आणि काटकसरीनं वापर करणे यासंदर्भात विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. नागरिकांनीही पाण्याचा जपून वापर करावा, असं आवाहन त्यांनी केलं. बुलढाणा, हिंगोली तसंच पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये जलसाठे कमी असल्यानं परिस्थिती गंभीर आहे. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून उपाययोजना आखण्यात आल्या असून जनतेला पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचं बावनकुळे म्हणाले. 'जल जीवन मिशन' अंतर्गत निधी उपलब्ध असून त्यात कोणतीही अडचण नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं .

पंचायत राज दिन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त देशभरातील लोकप्रतिनिधींचं अभिनंदन केलं आहे. "जनसेवेसोबतच राष्ट्रसेवेसाठी असलेलं समर्पण सर्वांना प्रेरणा देणारे आहे," अशा शब्दांत त्यांनी लोकप्रतिनिधींच्या कार्याचा गौरव केला. ग्रामीण भारताच्या विकासात आणि लोकशाहीच्या बळकटीकरणात पंचायत राज संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचंही त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

वडेट्टीवार

काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आमदार संजय गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाचे प्रकाशक प्रकाश आंबी यांना दिलेल्या धमकीचा निषेध करत त्यांनी हे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आघात असल्याचं म्हटलं आहे. आंबी यांना तात्काळ पोलीस संरक्षण द्यावे, अशीही मागणी करणारं पत्र वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलं आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक

महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक २०२६ अंतर्गत नागपूर जिल्ह्यात १४ मतदान केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. या निवडणुकीत एकूण ८ हजार ४५५ नोंदणीकृत मतदार २६ एप्रिल रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदानाचा हक्क बजावणार

आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल इथं मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. मतदानासाठी वैध फोटो, ओळखपत्र सादर करणे बंधनकारक असून मोबाईलसह इलेक्ट्रॉनिक वस्तूंवर बंदी घालण्यात आली आहे.

भारत दुर्गा मंदिर

डॉक्टर आबाजी थत्ते सेवा आणि अनुसंधान संस्थेद्वारे संचालित भारत दुर्गा मंदिराचा शिलान्यास आज नागपुरात नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट, आउटर रिंग रोड, जामठा इथे होत आहे. या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ मोहन भागवत, मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती असून श्रीकाष्ठिण पीठाधीश्वर गुरुशरणानंद महाराज, श्रीजूना पीठाधीश्वर आचार्य महामंडलेश्वर स्वामी, अवधेशानंद गिरी महाराज,स्वामी गोविंददेव गिरी महाराज, चिन्मय मिशनचे स्वामी मित्रानन्द, साध्वी ऋतंभरा देवी, बागेश्वर धाम श्री धीरेंद्र कृष्ण शास्त्री देखील उपस्थिती आहे. याशिवाय डॉक्टर आबाजी थत्ते सेवा आणि अनुसंधान संस्थेच्या नॅशनल हेल्थ केअर इन्स्टिट्यूटचा भूमिपूजन सोहळा देखील आज पार पडला.

तृतीय पुरस्कार

नागरी सेवा दिनानिमित्त मुंबईत झालेल्या 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान' अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. सर्वोत्कृष्ट कल्पना / उपक्रमांतर्गत 'बिंदू नामावली सॉफ्टवेअर' विकसित केल्याबद्दल अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाला तृतीय पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वैशाली पाथरे यांना प्रदान करण्यात आला. या सॉफ्टवेअरमुळे आरक्षणनिहाय माहिती आणि रोस्टर प्रक्रिया सुलभ झाली आहे. दरम्यान, अमरावती महापालिकेच्या 'कूल रुफ' संकल्पनेला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार मिळाला. या उपक्रमामुळे उन्हाळ्यात घरांचे तापमान कमी करण्यास मदत होत आहे.

डॉ.वीरेंद्र कुमार

केंद्र सरकारनं २०२५-२६ या आर्थिक वर्षात ७५ लाखांहून अधिक अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण आणि सक्षमीकरणासाठी ७ हजार ९८१ कोटी रुपयांहून जास्त

रक्कमेचं वाटप केल्याची माहिती सामाजिक न्याय आणि सक्षमीकरणमंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांनी दिली. याशिवाय, इतर मागासवर्ग, ज्येष्ठ नागरिक, पारलिंगी व्यक्ती, हातानं मैला उचलणारे कामगार, सफाई कर्मचारी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी विविध कायदे आणि योजनांची अंमलबजावणी देखील केली जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

वऱ्हाड अपघात

भंडारा जिल्ह्यात वऱ्हाडाचं वाहन आणि ट्रक यांच्यात झालेल्या भीषण अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला, तर चारजण गंभीर जखमी झाले. हा अपघात काल रात्री साडेनऊच्या सुमारास घडला. मृतांमध्ये चार महिलांचा समावेश आहे. वऱ्हाडाचं वाहन अनुचाळकडे जाताना सौंदड पुनर्वसन इथं पवनी मार्गावर विरुद्ध दिशेनं येणारा ट्रक वऱ्हाडाच्या वाहनाला धडकल्यानं ही दुर्घटना घडली.

शिष्यवृत्ती परीक्षा

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीनं घेतली जाणारी चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा येत्या रविवारी आयोजित करण्यात आली आहे. ही परीक्षा दोन सत्रांत घेतली जाणार असून पहिलं सत्र सकाळी ११ ते दुपारी साडेबारा तर दुसरं सत्र दुपारी २ ते साडेतीनच्या दरम्यान होणार आहे.

मासेमारी तलाव

सन २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्ष कालावधीसाठी यवतमाळ जिल्ह्यातील ५०० हेक्टरपर्यंतचे एकूण १३ तलाव मासेमारीसाठी ठेक्यानं देण्यात येणार आहेत. त्यासाठी मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. संबंधित तलावांसाठी नोंदणीनुसार, उपविधीतील कार्यक्षेत्रानुसार पात्र असणाऱ्या मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांनी तलाव ठेका मागणी परिपूर्ण प्रस्ताव दिनांक ११ मे रोजी जिल्हाधिकारी परिसरातील सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयात सादर करावा. या प्रक्रियेत पात्रतेचे निकष तलाव ठेका शासन निर्णय ३ जुलै २०१९ नुसार असतील.

दिव्य दक्षिण यात्रा

IRCTC तर्फे 12 दिवसांची विशेष **"**दिव्य दक्षिण यात्रा**"** भारत गौरव पर्यटक रेल्वेद्वारे सुरू करण्यात आली आहे. हे विशेष पर्यटन पॅकेज प्रवाशांना दक्षिण भारताच्या समृद्ध आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारशाचा अनुभव घेण्याची अनोखी संधी प्रदान करतो. ही यात्रा नागपूर येथून सुरू होईल. यात हंपी, म्हैसूर, कोईम्बतूर, तिरूअण्णामलई, वेल्लोर, तिरुपती आणि मल्लिकार्जुन या प्रमुख धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांचा समावेश असेल. या यात्रेचे प्रारंभिक पॅकेज मूल्य ₹21 हजार 690 प्रति व्यक्ती असं आहे.प्रवासी त्यांच्या सोयीप्रमाणे इकॉनॉमी रेल्वेच्या श्रेणी निवडू शकतात. ह्या गाडीची सुमारे 750 प्रवाशांची क्षमता आहे. रेल्वेत चढण्याची आणि उतरण्याची सुविधा नागपूर, वर्धा, बडनेरा, अकोला, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, नाशिक, इगतपुरी, कल्याण आणि पुणे इथं उपलब्ध करून देण्यात आली आहे. बुकिंग सेवा **IRCTC** च्या पर्यटन पोर्टलवर सुरू असून अधिक माहितीसाठी प्रवासी 8287931886 या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात.

मधमाशांचा हल्ला

गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्यातील डवकी इथं मोहफूल वेचण्यासाठी जंगलात गेलेल्या चौघांवर मधमाशांचा हल्ला झाला. या घटनेत तीन महिला आणि एक पुरुष जखमी झाले असून एकाची प्रकृती गंभीर आहे. सर्व जखमींवर देवरी ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

हवामान

आठवड्याच्या सुरवातीला वादळी पर्जन्यमानानंतर,काल पासून विदर्भात पुन्हा उष्णतेचा पारा वाढत आहे. उद्या अकोला , अमरावती आणि वर्धा जिल्ह्यासाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे. परवा नागपूर आणि चंद्रपूर मध्येही उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. दरम्यान आज अकोल्यात ४५ अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदविण्यात आलं असून नागरिकांनी उन्हापासून स्वतःच संरक्षण करण्याच आवाहन करण्यात आलं आहे.

आयपीएल

आयपीएलमध्ये आज संध्याकाळी साडेसात वाजता रॉयल चॅलेंजर्स बंगरुळू आणि गुजरात टायटन्स यांच्यात लढत होणार आहे. दरम्यान काल झालेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जनं मुंबई इंडियन्सचा १०४ धावांनी पराभव केला.

****